# शिक्षणातील बदलाची गरज

प्रत्यक्ष शिक्षणक्षेत्रात घडलेल्या, भूतकाळातील घटनांचा आढावा घ्यायचा तर, मला, एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीस घडलेल्या दोन घटनाच केवळ भावी काळाच्या दृष्टीने महत्त्वाच्या वाटतात. एक म्हणजे, २००५ साली केंद्र सरकारने प्रकाशित केलेला ‘ राष्ट्रीय शिक्षणक्रम आराखडा’; की जो आता देशभर लागू करण्यात आलेला आहे. दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे केंद्र सरकारने, २००९ साली अंमलात आणलेला, ‘ बालकाच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या कायदा.’ शिक्षणाचे भावी व दीर्घकाळचे शिक्षण, नेमकेपणाने कोणत्या दिशेने जाणार आहे ते या दोन घटनांनी ठरवून दिलेले आहे.

बालकाच्या शिक्षणहक्काच्या कायद्याने, शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची ग्वाही दिली आहे तर राष्ट्रीय शिक्षणक्रम आराखड्याने हे शिक्षण मूलतः दर्जेदार असेल, उपयुक्त असेल असे आश्वासन दिले आहे. या दोन्ही घटना एकत्रितपणे लक्षात घेतल्या तर, एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाने, भारतीय (आणि अर्थातच, महाराष्ट्रीय) शिक्षणात परिवर्तनाची नांदी केली आहे असे मला वाटते.

परिस्थितीत काही मूलभूत स्वरूपाचा बदल घडून आला तर, त्याला अनुसरून शिक्षणातही बदल व्हावे लागतात. स्थूलमानाने सांगायचे तर, विसावे शतक हे औद्योगिक विकासाचे शतक होते. कारखाने, मालक-मजूर संबंध, उत्पादन व नफा वाढीचे उद्दिष्ट, कामाच्या स्वरूपानुसार पुनरुक्तीचे, सरावाने कौशल्यवाढीचे काम करणारा कर्मचारी वर्ग, औद्योगिक व्यापाराचे देशा-विदेशात विस्तारणारे क्षेत्र आणि सरकारचे सतत बदलते पण नियंत्रणाचे धोरण यांमुळे शिक्षणक्षेत्राचे, त्यांतील तात्कालिक बदलांचे स्वरूप वेळोवेळी ठरत गेले. एकसूरी समाज आणि त्याचे एकसूरी शिक्षण अशी काहीशी ही परिस्थिती होती. बाजारपेठेच्या श्रमकार्याच्या गरजांनुसार शिक्षित घडविण्याची जबाबदारी ही शिक्षणरचना पार पाडत होती. शिवाय, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात विकसित होत गेलेल्या मानसशास्त्रातील वर्तनवादी विचारसरणीचा बळकट आधारही या शिक्षणरचनेला प्राप्त झाला होता. त्यामुळे सारे शालेय शिक्षण आणि शालेय व्यवस्थापन बांधीव, घट्ट वा पठडीबद्ध असे झाले होते. विसाव्या शतकाच्या गरजा भागविण्याचे काम त्यातून होत होते.

काळ बदलला की, शिक्षण बदलते, बदलावे लागते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात एकविसाव्या शतकातील शिक्षणबदलाची बीजे पेरली जात होती. संगणकीय तत्त्वज्ञान आणि तंत्रज्ञान यांतील नवशोधांनी

शास्त्रज्ञानही बदलू लागले. शिक्षणशास्त्राशी संबंधित अशा विविध शास्त्रांमधील संशोधने, संगणकाच्या मदतीने वेगाने पुढे सरकू लागली. त्यांतून, जगाचे व्यावसायिक आणि व्यावहारिक रूपही एकीकडे बदलू लागले, तर दुसरीकडे, माणूस शिकतो कसा, मुले शिकतात कशी यांच्या नैसर्गिक प्रक्रिया उलगडू लागल्या. अशा दिशेने ‘ शिकण्या’ बाबतच्या संशोधनात, भाषाशास्त्र , मानसशास्त्र आणि मुख्यतः मेंदूविषयक मज्जाशास्त्र, ही शास्त्रे अग्रेसर होती. परिणामतः एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला, एक नवे जग, आव्हानात्मक रूपाने आपल्यापुढे उभे ठाकले. जुने व्यवसाय संगणकीय होऊ लागल्याने तेथील श्रमशक्तीची गरज घटू लागली आणि संगणकीय क्षेत्रांत, नव्याने उदयास आलेल्या ‘ माहिती-तंत्रज्ञाना’ च्या क्षेत्रात, नव्या शिक्षणाने सज्ज असेल अशा श्रमशक्तीची गरज वेगाने वाढू लागली. हा परिणाम केवळ अशा श्रमशक्तीच्या बाजारपेठेतील परिणाम नव्हता तर त्याने शिक्षणाच्या अंतर्गत मूलभूत बदलाच्या अपेक्षांना चालना दिली.

आता शिक्षणाचा नव्या गरजांनुसार, नव्या अपेक्षांनुसार शिक्षणाची उद्दिष्टे बदलली आणि शिक्षणाच्या पध्दतीही बदलत आहेत; आणि याचे स्पष्ट प्रतिबिंब २००५ च्या राष्ट्रीय शैक्षणिक आराखडयात उमटले आहे. भारतात, लिखित स्वरूपाच्या राज्यघटनेने आपल्या जाहीरनाम्याच्या स्वरूपात मूलभूत मानवी समाज जीवनाची दीर्घकालची ध्येये मांडून ठेवली आहेतच. या ध्येयांना अनुसरून, नव्या शैक्षणिक आराखडयाने नवी शैक्षणिक उद्दिष्टे आपल्यापुढे ठेवली आहेत.

- आचार-विचारांचे स्वातंत्र्य
- दुसऱ्यांबाबत सहिष्णुतेची भावना
- नव्या परिस्थितीला तोंड देण्याची लवचिकता वा सर्जनशीलता
- लोकशाही प्रक्रियेत भाग घेण्याची तयारी
- आर्थिक वा सामाजिक बदलांसाठी श्रम करण्याची तयारी.

वरवर वाचताना सोपी वाटणारी ही उद्दिष्टे व्यवहारात आणताना खूप मोठे बदल आपल्याला करावे लागणार आहेत आणि शिक्षणव्यवहारातील मंडळींना ते सोसावे लागणार आहेत. सरकारी अधिकाऱ्यांची ‘ अधिकारी ’ वृत्ती कमी करून त्यांनी त्यांची ‘ लोकसेवा ’ वृत्ती जागृत करण्याची पहिली गरज आहे. शिक्षकांनी आपली ‘ गुलामी ’ वृत्ती बदलून आचार-विचारांचे स्वातंत्र्य समजावून घेऊन आपल्या वर्गशिक्षणात आणणे ही दुसरी गरज आहे. विद्यार्थ्यांना कसेही खरे खोटे करून पास करवून घेण्याची वृत्ती, आपल्याच मुलांच्या अंतिम हितार्थ पालकांनी दूर करायला शिकले पाहिजे; त्यासाठी ‘ खरे शिक्षण ’ ही त्यांनी समजावून घेतले पाहिजे. आज आपल्या शाळांतील व्यवहार सरकारी निरर्थक दबडघ्याने, शिक्षकांच्या उदासीनतेनेपालक-संस्थाचालकांच्या

गैरहेतूंनी आणि पदोपदीच्या प्रचंड भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे. नवे शिक्षण, नव्या पध्दती, नवे व्यवस्थापन, नव्या नियमावली हा त्यांवरील अंतिम उतारा आहे. नव्या पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शिक्षणाची ‘ स्वच्छता ’ करणे अत्यावश्यक आहे.

❖